**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :०१**

नगरसचिव कार्यालय

दिनांक : २१ /०४ /२०१६

प्रति,

मा. ------------------------------------

स्थायी समिती, सदस्य

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र -०१ सोमवार दि.२५ /०४/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-

प्र. नगरसचिव,

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये. अहमदनगर महानगरपालिका

**सोमवार दिनांक- २५ /०४ /२०१६ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| १ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०५ शनिवार दिनांक ३०/०१/२०१६ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०६ शनिवार दिनांक २०/०२/२०१६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| २ | अहमदनगर महानगरपालिकेचे श्री. छत्रपती संभाजी महाराज व्यापारी संकुल येथील हॉल बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी) क्र.२ यांना प्रकल्प कार्यालयासाठी हॉल ३(तीन)वर्षे भाडे कराराने दरमहा भाडे व अनामत रक्कम घेउन भाडेतत्वावर देणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ३ | अर्जदार श्री.शांतीलाल हिरालाल बोरा रा.औरंगाबाद रोड,अकबर नगर जवळ अ.नगर सावेडी प्रभाग समिती क्र.१ ,वॉर्ड क्रमांक ५९, बील क्रमांक ४४९,शेतजमिनीस आकारण्यात आलेली घरपट्टीची आकारणी ची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ४ | अर्जदार श्री.डॉ.अशोक तुळशीराम घुले रा.औरंगाबाद रोड,अकबर नगर जवळ अ.नगर सावेडी प्रभाग समिती क्र.१,वॉर्ड क्र. ५९,बील क्र.४७७,शेतजमिनीस आकारण्यात आलेली घरपट्टीची आकारणीची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५ | महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारीत)अधिनियम २०१२ चे कलम ४६५ अन्वये महानगरपालिका अहमदनगर लेखापरिक्षा विनिमय- २०१६ मा.स्थायी समिती सभेसमोर सादर. |
| ६ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञांच्या पॅनलमध्ये डॉ. श्री. कृष्णा जी. अनारसे यांचा कॉल बेसीसवर समाविष्ट करणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ७ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.ज्योती लालासाहेब शिंदे (सोनवणे) यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत. |
| ८ | अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील ) यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत. |
| ९ | अहमदनगर महानगरपालिकेचे मोटार व्हेईकल विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (ॲटोमोबाईल इंजि.) या पदावर तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहामहिन्याकरीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत. |
| १० | राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान सन २०१४-१५ अंतर्गत ई -निविदा क्र.१०८७ अहमदनगर महानगरपालिका राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत मुकुंद नगर स.नं.३४०/३४०/३, ३४१/४/ येथे आरोग्य केंद्राचे बांधकाम करणेसह १.५० के.व्हि. हायब्रीड सोलर सिस्टीम व अग्नीशमन व्यावस्था करणे. |
| ११ | राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान सन २०१४-१५ अंतर्गत ई -निविदा क्र.१०८८ अहमदनगर महानगरपालिका राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत केडगांव स.नं.४२२/१ब येथे प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम करणेसह विद्युत व्यवस्था करणे. |
| १२ | राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान सन २०१४-१५ अंतर्गत ई -निविदा क्र.१०८६ अहमदनगर महानगरपालिका राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत नागापुर स.नं.४/२+४/२ ४/३अ +४३ येथे प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम करणेसह विद्युत व्यवस्था करणे. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** १] विषय क्रमांक- १ - मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०५ शनिवार दिनांक ३०/०१/२०१६ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०६ शनिवार दिनांक २०/०२/२०१६ रोजीच्या सभेचे इतिवृत्ताची प्रत

२] विषय क्रमांक- २ ते १२ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- ०१ सोमवार दि.२५/४/२०१६

**प्रस्तावाचा विषय** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०५ शनिवार दिनांक ३०/०१/२०१६ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०६ शनिवार दिनांक २०/०२/२०१६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकुर :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०५ शनिवार दिनांक ३०/०१/२०१६ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०६ शनिवार दिनांक २०/०२/२०१६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- सभा सुरू करा.

सभेच्या सुचने चे वाचन केले.

मा.सभापती साहेब - मागील सभेचे इतिवृत्त वाचन करा.

मागील सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.श्रीपाद छिंदम - इतिवृत्त कायम मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.अनिल बोरूडे - विषय मंजूर करावा.

मा.सभापती साहेब - प्रस्तावातील दोन्ही सभांचे इतिवृत्त कायम करण्यात यावे.

**ठराव -** सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मागील मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०५ शनिवार दिनांक ३०/०१/२०१६ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०६ शनिवार दिनांक २०/०२/२०१६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेस हि सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.श्रीपाद छिंदम सही /-

अनुमोदक :- मा. श्री.अनील बोरूडे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-<br>
सभापती,<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१**

विषय क्रमांक- ०२ सोमवार दि.२५/४/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी) क्र.२ यांचे अर्जानुसार श्री.छत्रपती संभाजी महाराज व्यापारी संकुलातील हॉल भाडेतत्वावर देणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका मार्केट विभाग

संदर्भ :- बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी) क्र.२ नगर यांचा दि.४/२/२०१६ चा अर्ज

उपरोक्त संदर्भाकित विषयान्वये विनंती पूर्वक रिपोर्ट सादर करण्यात येतो की,बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी)क्र.२ नगर यांनी संदर्भिय पत्राने म.न.पा.च्या ताब्यात असलेली ८०० ते ९०० चौ.फुट जागेची मागणी कार्यालयाकरीता केलेली आहे.त्यानुसार बालविकास प्रकल्पाधिकारी यांना दि.९/२/२०१६ रोजी छत्रपती संभाजी महाराज व्यापारी संकुलातील हॉल समक्ष दाखविण्यात आला सदर हॉल ८९.६८ चौ.मी.आहे.

सदर हॉल यापूर्वी मा.कार्यकारी अभियंता म.रा.वि.म.यांना भाडे तत्वावर देणेबाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती ठराव नं.९ दि.१६/१२/१४ने पारीत झाला.सदर ठरावानूसार दि.२१/४/१५व ३१/१०/१५ रोजी दोन वेळेस निविदा मागवून सुध्दा निविदा प्राप्त झाल्या नाहीत.त्यामुळे सदर हॉल रिकामा आहे.सदर हॉल क्षेत्र ८९.६८ चौ.मी.आहे. मा.नगररचनाकार यांनी जा.क्र.टि.पी.८५१७दि.२१/१०/१५अन्वये द.म.भाडे१४९/-प्रती चौ.मी.व अनामत रक्कम रू.१४९००/-प्रती चौ.मी.प्रमाणे भाडे व अनामत ठरवून दिली आहे.परंतू सदर कार्यालय शासकीय असल्याने अनामत रक्कम घेणे योग्य होणार नाही दि.१५/११/१४च्या पत्रात नमुद केले आहे.

तरी श्री.छत्रपती संभाजी महाराज व्यापारी संकुलातील हॉल बाल विकास प्रकल्पधिकारी (नागरी) क्र.२ नगर यांना दरमहा भाडे १३३६३/- घेवून तीन वर्ष कराराने देणे बाबत.प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस आदेशार्थ सादर./अ

येणे प्रमाणे मार्केट विभाग प्रमुख यांचा अभिप्राय असे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय कि, "अ" प्रमाणे मान्यतेस हरकत नाही.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त साहेब यांचा अभिप्राय कि,उपरोक्त सविस्तर अहवालाप्रमाणे धोरणात्मक निर्णयाकरिता मा.स्थायी समितीकडे सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब **:-** बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी) क्र.२ यांना श्री.छत्रपती संभाजी महाराज व्यापारी संकुलातील हॉल भाडेतत्वावर देणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम - ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.सभापती साहेब :- या विषयाची माहिती सांगा.

मा.उपायुक्त (सा) श्री. चारठाणकर :- बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी)क्र.२ हे शासकिय कार्यालय आहे.त्यांना जागा देण्याची महानगरपालिकेची प्राथमीक जबाबदारी आहे.या कार्यालयाकडून आपण डिपॉझिट घेणार नाही.फक्त भाडे घेणार आहे.आपल्या कार्यालयाशी संलग्न कार्यालय आहे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ छाया तिवारी :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :-श्री.छत्रपती संभाजी महाराज व्यापारी संकुलातील हॉल भाडेतत्वावर बाल विकास प्रकल्पधिकारी (नागरी) क्र.२ नगर यांना भाडेकराराने देणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-**ऑफीस रिपोर्ट व सभागृहातील चर्चेनुसार श्री.छत्रपती संभाजी महाराज व्यापारी संकुलातील हॉल भाडेतत्वावर बाल विकास प्रकल्पधिकारी (नागरी) क्र.२ नगर यांना दरमहा भाडे १३३६३/- घेवून तीन वर्ष कराराने देणेस हि सभा मान्यता देत आहे.ऑफीस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.श्रीपाद छिंदम सही /-

अनुमोदक :- मा.सौ.छाया तिवारी सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०१

विषय क्रमांक- ०३ सोमवार दि.२५/४/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री.शांतीलाल हिरालाल बोरा रा.औरंगाबाद रोड,अकबर नगर जवळ अ.नगर सावेडी प्रभाग समिती क्र.१ ,वॉर्ड क्रमांक ५९, बील क्रमांक ४४९,शेतजमिनीस आकारण्यात आलेली घरपट्टीची आकारणी ची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सावेडी प्रभाग समिती क्र. १

संदर्भ :- श्री. शांतीलाल हिरालाल बोरा , रा. अ. नगर यांचा यांचा दिनांक २६.६.२०१४ चा अर्ज

उपरोक्त विषयाकिंत संदर्भान्वये वसुली वॉर्ड क्रमांक ५९ चे लिपिक यांजकडून अहवाल सादर करण्यात येतो की, अर्जदार यांनी दिलेल्या अर्जामध्ये नमुद केले आहे की, सावेडी सर्व्हे नं.७५/१अ असा सर्व्हे नबर असुन त्यामध्ये ३२ गुंठे शेतजमिन असुन त्या शेतजमिनीची बिगर शेती झालेली नाही. तरी सदर जमिनीस मालमत्ता कराची आकारणी करण्यात आलेली आहे ती रद्द करण्याविषयी वेळोवेळी विनंती अर्ज केलेला आहे.

वरीलबाबत इकडील अभिलेख व संगणक पडताळणी केली असता असे दिसुन येते की, सदर सर्व्हे नंबर पैकी असलेल्या खुल्या जागेस ३२ गुंठे क्षेत्रफळ असलेल्या जागेला पुर्वीपासून मालमत्ता कराची आकारणी करण्यात आल्याचे दिसुन येत आहे.

सोबत जोडलेल्या ७/१२ उतारा-यावर तशी नोंद दिसुन येत आहे. मालमत्ता रजिष्टर क्रमांक बिल नंबर ४४९ असे असुन सन १९९५ ते २०१६ अखेर मुददल १,३०,०६२/- व शास्ती १,२९,७५१/- इतकी थकबाकी असुन श्री. शांतीलाल हिरालाल बोरा यांचे नावाने येणे बाकी असल्याचे दिसुन येत आहे.

तरी सदर जमिन बिगरशेती झालेली नाही. तरी आकारण्यात आलेल्या मालमत्त करामध्ये उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार कर आकारणी येते किंवा कसे ? तसेच सदर जागेवर अहमदनगर शहर व मंजुर विकास योजनेमध्ये सदरची जागा आरक्षण आहे किंवा कसे ? असल्यास कशासाठी आरक्षण आहे याबाबत सबंधीत विभाग, नगररचनाकार यांचा अभिप्राय घेणे योग्य होईल.

सदरचा प्रस्ताव योग्य त्या मान्यतेस सविनय सादर.

येणेप्रमाणे वसुली क्लार्क यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावामध्ये नमुद केल्याप्रमाणे सदरची जागा हि खुल्या स्वरूपाची असुन शेती पैकी जागा आहे बिगर शेती आलेली नाही. परंतु मालमत्ता कराची आकारणी १९९५ पासून आलेली आहे. तरी सदर जागेस कराची आकारणी करता येते किंवा कसे ? व सदर जागे विकास आराखडयामध्ये आरक्षण आहे किंवा कसे याबाबत अभिप्राय नगररचनाकार घेणे आवश्यक आहे. सबब प्रस्ताव योग्य त्या मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर रिव्हीजन विभाग यांचा सहमती दर्शक सही

यावर सहा.मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की, सादर मा.नगररचनाकार यांचा सदर मालमत्ता बिगर शेती आहे किंवा नाही त्याबाबत अभिप्राय घेवून फेरसादर करावे.

यावर प्र.नगररचनाकार यांचा अभिप्राय की, प्रकरणा समवेत सादर केलेले ७/१२ उतारा व मोजणी नकाशा पाहता सदरची जागा बिगरशेती झाल्याचे दिसत नाही मात्र दुस-या सुधारित विकास योजनेमध्ये सदर जागेमधुन ४०' (१८.३० मी) रस्ता जात असुन याच जमीनीचा आरक्षण क्र.५८ (पोलीस चौकीसाठी) ते आरक्षित आहे. मात्र सदर जमीनीची घरपट्टी जमीन क्षेत्रपैकी असल्याने घरपट्टी निर्लेखित हरकत नाही.

यावर मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, प्र. नगररचनाकार यांच्या अभिप्रायानुसार "अ" प्रमाणे धोरणात्मक बाब असल्याने योग्य त्या प्राधिकरणाची नियमानुसार मंजुरी घेउन पुढील कार्यवाही करणे उचित ठरेल.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केलेनुसार "अ" प्रमाणे जमीन शेती विभाजन व आरक्षित असलेने निर्लेखित करणेस हरकत नाही , महराष्ट्र मनपा अधि.१९४९ चे कलम १५२ अन्वये निर्लेखित करणेसाठी मे.स्थायी समिती सभेला पाठविणेस हरकत नाही मे.आदेशार्थ स. सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" नुसार पुढील कार्यवाहीकरिता

***

जा.क्र.नगरसचिव विभाग क्र.१३४ दिनांक २८/८/२०१५

महानगरपालिका प्रशासनामार्फत दिनांक २९/७/२०१५ रोजी अर्जदार श्री. शांतीलाल हिरालाल बोरा रा. औरंगाबाद रोड, अकबर नगर जवळ ,अ.नगर सावेडी प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.५९, बील क्र.४४९ , शेतजमिनीस आकारण्यात आलेली घरपट्टीची आकारणीची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेसाठी तथा निर्णयासाठी दाखल केला होता. तथापि सदर सदर प्रस्तावास १५ दिवस पेक्षा जास्त कालावधी झालेला आहे आणि याबाबत मा.स्थायी समिती सभेचा निर्णय झाला नसल्यामुळे सदरचा प्रस्ताव प्रशासनाकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी परत पाठविण्यात येत आहे.

येणेप्रमाणे प्र.नगरसचिव विभाग यांचे पत्र

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय कि,उपायूक्त (कर)

यावर मा.उपायुक्त (कर) अभिप्राय कि, प्रभाग अधिकारी क्र.१ महाराष्ट्र मनपा अधिनियम अनुसुचित "ड" प्रकरण -८ नियम ३(क) नुसार कार्यवाही करावी.

यावर प्रभाग अधिकारी क्र. यांचा अभिप्राय की, कर निरीक्षक

यावर प्रभाग अधिकारी क्र. १ यांचा अभिप्राय की, फेरसादर सावेडी प्रभाग समिती क्र.१ यांजकडून अहवाल सादर करण्यात येतो की, या विभागाने वसुली वॉर्ड क्र.५९ बिील क्र.४४९ या मिळकतीबाबत मालमत्ता कराच्या माफी बाबत प्रस्ताव पाठविण्यात आलेला असता मा.स्थाथी समिती यांच्याकडील प्रस्तावानुसार सादर केला असता सदरच्या प्रस्तावावर १५ दिवसापेक्षा जास्त कालावधी झाल्याचा उल्लेख नजरचुकीने दर्शविण्यात आल्याने सदरचा प्रस्ताव प्रशासनाने निर्णय घेणेबाबत सादर केलेला आहे. याबाबत प्र. नगरसचिव यांच्या शी दि.०४/०९/२०१५ रोजी भ्रमणध्वनी द्वारे झालेल्या चर्चा नुसार पुढील कारवाईस्तव सदरच्या प्रस्तावाचा कालावधी ४५ दिवसाऐवजी चुकीने १५ दिवस दर्शविल्याने उक्त नियमातील तरतुदीनुसार प्रस्ताव मान्यतेस्तव फेरसादर करण्यात येत आहे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांची सहमती दर्शक सही

यावर मा. अति. आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रभाग अधिकारी क्र.१ समक्ष चर्चा करावी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---****---

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब **:-** अर्जदार श्री.शांतीलाल हिरालाल बोरा यांना प्रभाग समिती क्र.१ ,वॉर्ड क्रमांक ५९, बील क्रमांक ४४९,शेतजमिनीस आकारण्यात आलेली घरपट्टीची आकारणी ची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्या प्रमाणे सभेमध्ये आफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- विषय क्रमांक ३ व ४ ऑफिस रिपोर्ट नुसार घरपपट्टी निर्लेखीत करण्यात यावी व शास्ती निर्लेखीत करण्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

मा.सौ.छाया तिवारी :- विषय क्रमांक ३ व ४ ऑफिस रिपोर्ट नुसार घरपपट्टी निर्लेखीत करण्यात यावी व शास्ती निर्लेखीत करण्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक ३ व ४ हे शेतजमिनीस आकारण्यात आलेली घरपट्टी निर्लेखित करावयाचे विषय असल्याने विषय क्रमांक ३ व ४ ऑफिस रिपोर्ट नुसार घरपपट्टी निर्लेखीत करण्यात यावी व शास्ती निर्लेखीत करण्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

**ठराव :-**अर्जदार श्री.शांतीलाल हिरालाल बोरा रा.औरंगाबाद रोड,अकबर नगर जवळ अ.नगर सावेडी प्रभाग समिती क्र.१ ,वॉर्ड क्रमांक ५९, बील क्रमांक ४४९,शेतजमिनीस आकारण्यात आलेली घरपट्टी आकारणीची रक्कम निर्लेखित करण्यास ही सभा मान्यता देत आहे. आणि शास्ती निर्लेखीत करण्याची बाब स्थायी समितीच्या कक्षेत नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.श्रीपाद छिंदम सही /-

अनुमोदक :- मा.सौ.छाया तिवारी सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०१

विषय क्रमांक- ०४ सोमवार दि.२५/४/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री.डॉ.अशोक तुळशीराम घुले रा.औरंगाबाद रोड,अकबर नगर जवळ अ.नगर सावेडी प्रभाग समिती क्र.१,वॉर्ड क्र. ५९,बील क्र.४७७,शेतजमिनीस आकारण्यात आलेली घरपट्टीची आकारणीची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सावेडी प्रभाग समिती क्र.१

उपरोक्त विषयाकिंत संदर्भान्वये वसुली वॉर्ड क्रमांक ५९ चे लिपिक यांजकडून अहवाल सादर करण्यात येतो की, अर्जदार यांनी दिलेल्या अर्जामध्ये नमुद केले आहे की, सावेडी सर्व्हे नं.७५/२/१ब/२पै.असा सर्व्हे नबर असुन त्यामध्ये ६ गुंठे शेतजमिन असुन त्या शेतजमिनीची बिगर शेती झालेली नाही. तरी सदर जमिनीस मालमत्ता कराची आकारणी करण्यात आलेली आहे ती रद्द करण्याविषयी वेळोवेळी विनंती अर्ज केलेला आहे.

वरीलबाबत इकडील अभिलेख व संगणक पडताळणी केली असता असे दिसुन येते की, सदर सर्व्हे नंबर पैकी असलेल्या खुल्या जागेस ८ गुंठे क्षेत्रफळ असलेल्या जागेला पुर्वीपासून मालमत्ता कराची आकारणी करण्यात आल्याचे दिसुन येत आहे.

सोबत जोडलेल्या ७/१२ उतारा-यावर तशी नोंद दिसुन येत आहे. मालमत्ता रजिष्टर क्रमांक बिल नंबर ४७७ असे असुन सन १९९५ ते २०१६ अखेर मुददल ५३,७२८/- व शास्ती ४५,८७५/- इतकी थकबाकी असुन श्री. घुले यांचे नावाने येणे बाकी असल्याचे दिसुन येत आहे.

तरी सदर जमिन बिगरशेती झालेली नाही. तरी आकारण्यात आलेल्या मालमत्त करामध्ये उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार कर आकारणी येते किंवा कसे ? तसेच सदर जागेवर अहमदनगर शहर व मंजुर विकास योजनेमध्ये सदरची जागा आरक्षण आहे किंवा कसे ? असल्यास कशासाठी आरक्षण आहे याबाबत सबंधीत विभाग, नगररचनाकार यांचा अभिप्राय घेणे योग्य होईल.

सदरचा प्रस्ताव योग्य त्या मान्यतेस सविनय सादर.

येणेप्रमाणे वसुली क्लार्क यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावामध्ये नमुद केल्याप्रमाणे सदरची जागा हि खुल्या स्वरूपाची असुन शेती पैकी जागा आहे बिगर शेती आलेली नाही. परंतु मालमत्ता कराची आकारणी १९९५ पासून आलेली आहे. तरी सदर जागेस कराची आकारणी करता येते किंवा कसे ? व सदर जागेवर विकास आराखडयामध्ये आरक्षण आहे किंवा कसे याबाबत अभिप्राय नगररचनाकार घेणे आवश्यक आहे. सबब प्रस्ताव योग्य त्या मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर रिव्हीजन विभाग यांचा सहमती दर्शक सही

यावर सहा. मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की, सादर सदर बाबत मा.नगररचनाकार यांचा अभिप्राय घेउन सादर करणे.

यावर प्र.नगररचनाकार यांचा अभिप्राय की, प्रस्तावासमवेत सादर केलेले ७/१२ उतारा व मोजणी नकाशा पहाता सदरची जागा बिगरशेती झालेली दिसून येत नाही.मात्र दुस-या सुधारित मंजूर निहाय योजनेनुसार सदर जागेमधून ६०(१८.३०मी.) रूंदीचा रस्ता जात असून आरक्षण ५८ (पोलीस चौकी साठी) आरक्षीत आहे.मात्र सदर जागा ही शेतजमीन असल्याने घरटपट्टी निर्लेखित करण्यास हरकत नाही.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,प्र.नगररचनाकार यांच्या अभिप्रायानुसार "अ" प्रमाणे धोरणात्मक बाब असल्याने योग्य त्या प्रधिकरणाची नियमानुसार मंजूरी घेवून पुढील कार्यवाही करणे उचित राहील.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय कि,यथाप्रस्तावित नुसार जमिन बिनशेती नाही.तिचा लेआउट मंजूर नाही.नमुद "अ" नुसार उक्त जमिनीतून ६० रूंदीचा रस्ता जात आहे.सबब "अ" नुसार घरपट्टी निर्लेखित करण्यास हरकत नाही. रक्कम निर्लेखित करणेचा प्रस्ताव महाराष्ट्र मनपा अधि.१९४९ चे कलम १५२ नुसार मे.स्थायी समिती सभेत पाठविणेस हरकत नाही.आदेशार्थ सादर.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त साहेब यांचा अभिप्राय कि,"अ"नुसार पुढील कार्यवाही करिता.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

***

जा.क्र.नगरसचिव विभाग क्र.१३५ दिनांक २८/८/२०१५

महानगरपालिका प्रशासनामार्फत दिनांक २९/७/२०१५ रोजी अर्जदार डॉ.श्री.अशोक तुळशीराम घुले रा. औरंगाबाद रोड, अकबर नगर जवळ ,अ.नगर सावेडी प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.५९, बील क्र.४७७ , शेतजमिनीस आकारण्यात आलेली घरपट्टीची आकारणीची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेसाठी तथा निर्णयासाठी दाखल केला होता. तथापि सदर सदर प्रस्तावास १५ दिवस पेक्षा जास्त कालावधी झालेला आहे आणि याबाबत मा.स्थायी समिती सभेचा निर्णय झाला नसल्यामुळे सदरचा प्रस्ताव प्रशासनाकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी परत पाठविण्यात येत आहे.

येणेप्रमाणे प्र.नगरसचिव विभाग यांचे पत्र

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय कि,उपायुक्त (कर)

यावर मा.उपायुक्त (कर) अभिप्राय कि, प्रभाग अधिकारी क्र.१ महाराष्ट्र मनपा अधिनियम अनुसुचित "ड" प्रकरण -८ नियम ३(क) नुसार कार्यवाही करावी.

यावर प्रभाग अधिकारी क्र. यांचा अभिप्राय की, कर निरीक्षक

यावर यांचा अभिप्राय की, फेरसादर सावेडी प्रभाग समिती क्र.१ यांजकडून अहवाल सादर करण्यात येतो की, या विभागाने वसुली वॉर्ड क्र.५९ बील क्र.४७७ या मिळकतीबाबत मालमत्ता कराच्या माफी बाबत प्रस्ताव पाठविण्यात आलेला असता मा.स्थाथी समिती यांच्याकडील प्रस्तावानुसार सादर केला असता सदरच्या प्रस्तावावर १५ दिवसापेक्षा जास्त कालावधी झाल्याचा उल्लेख नजरचुकीने दर्शविण्यात आल्याने सदरचा प्रस्ताव प्रशासनाने निर्णय घेणेबाबत सादर केलेला आहे. त्याबाबत प्र. नगरसचिव यांच्या शी दि.०४/०९/२०१५ रोजी भ्रमणध्वनी द्वारे झालेल्या चर्चा नुसार पुढील कारवाईस्तव सदरच्या प्रस्तावाचा कालावधी ४५ दिवसाऐवजी चुकीने १५ दिवस दर्शविल्याने उक्त नियमातील तरतुदीनुसार प्रस्ताव मान्यतेस्तव फेरसादर करण्यात येत आहे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांची स्वाक्षरी

यावर अतिरिक्त आयुक्त यांचा अभिप्राय कि,उपरोक्त सविस्तर अहवालानुसार तरतुदी अन्वये "अ"प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---****---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब **:-** अर्जदार श्री.डॉ.अशोक तुळशीराम घुले यांना प्रभाग समिती क्र.१,वॉर्ड क्र. ५९,बील क्र.४७७,शेतजमिनीस आकारण्यात आलेली घरपट्टीची आकारणीची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्या प्रमाणे सभेमध्ये आफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- विषय क्रमांक ३ व ४ ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.छाया तिवारी :- विषय क्रमांक ३ व ४ ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक ३ व ४ हे शेतजमिनीस आकारण्यात आलेली घरपट्टी निर्लेखित करावयाचे विषय असल्याने मंजूर करण्यात येत आहे. व शास्ती निर्लेखीत करण्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

**ठराव :-**अर्जदार श्री.डॉ.अशोक तुळशीराम घुले रा.औरंगाबाद रोड,अकबर नगर जवळ अ.नगर सावेडी प्रभाग समिती क्र.१,वॉर्ड क्र. ५९,बील क्र.४७७,शेतजमिनीस आकारण्यात आलेली घरपट्टीची आकारणीची रक्कम निर्लेखित करण्यास ही सभा मान्यता देत आहे. आणि शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.श्रीपाद छिंदम सही /-

अनुमोदक :- मा.सौ.छाया तिवारी सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०१**

विषय क्रमांक- ०५ सोमवार दि.२५/४/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारीत)अधिनियम २०१२ चे कलम ४६५ अन्वये महानगरपालिका अहमदनगर लेखापरिक्षा विनिमय - २०१६ मा.स्थायी समिती सभेसमोर सादर.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका लेखापरिक्षण विभाग जा.क्र.२९८ दि.१९/३/२०१६

प्रति,
मा.सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

विषय :-महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारीत)अधिनियम २०१२चे कलम ४६५अन्वये महानगरपालिका अहमदनगर लेखापरिक्षा विनिमय - २०१६ मा.स्थायी समिती च्या मंजूरीस्तव.

उरोक्त विषयास अनुसरून सविनय सादर की, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारीत)अधिनियम २०१२ मधिल कलम ४६५(२)(क) अन्वये महानगरपालिकेच्या महसुलातून खर्च करण्यास मान्यता न देण्याच्या बाबतीतल्या "मुख्य लेखापरीक्षक" यांच्या अधिकाराबाबत विनियम करण्याची तरतूद आहे.

त्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपलिका (सुधारित)अधिनियम २०१२ मधील कलम ४६५ (२)नुसार असे विनियम करण्याचा संवैधानिक अधिकार करण्यात येवून करण्यात आलेले "महानगरपालिका अहमदनगर लेखापरिक्षा - २०१६" हे मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सविनय सादर करण्यात येत आहेत.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ॼ २०१२ अनुसुची "ड" प्रकरण (३)(२) नियम ९ अन्वये प्राप्त अधिकारात तयार करण्यात आलेले "महानगरपालिका अहमदनगर लेखापरिक्षा - २०१६" सोबत अवलोकनार्थ सविनय सादर करण्यात येत आहेत.

सदरचे विनियम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ चे कलम ४६५(२) नुसार मंजुरीच्या प्रयोजनाकरीता मा.स्थायी समिती सभेसमोर सादर करणे आवश्यक आहे.तदानुषंगाने कार्यवाहीबाबत मा.नगरसचिव यांना आदिशित करणेस विनंती आहे.

सोबत १) महानगरपालिका अहमदनगर लेखापरिक्षा विनियम - २०१६.
२) महानगरपालिका अहमदनगर लेखापरीक्षा नियम -२०१६

येणेप्रमाणे मुख्य लेखा परिक्षक यांचा सादर असे

## महानगरपालिका अहमदनगर लेखा परीक्षा विनियम 2016

(21 मार्च 2016)

सदरचे विनियम पुढील आदेश व अधिनियम या अन्वये करण्यात आलेले आहेत.

सन 1949 चा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम.

सन 2012 चा सुधारीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम.

राष्ट्रीय नगरपरिषद लेखा संहिता 2004.

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1931.

(महाराष्ट्र शासन, वित्त विभाग)

ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारित) अधिनियम 2012 मधील कलम 465(2) अन्वये स्थायी समितीस या अधिनियमाशी व नियमांशी विसंगत नसतील असे विनियम करण्याचा संवैधानिक अधिकार प्राप्त आहे. त्याअर्थी कलम 465 (2) (क) अन्वये महानगरपालिकेच्या महसुलातून खर्च करण्यास मान्यता न देण्याच्या बाबतीतले "मुख्य लेखा परीक्षक यांचे अधिकार" आणि अशा खर्चाबाबत घेतलेल्या आक्षेपांचे निराकरण करण्याच्या बाबतीत अनुसरावयाची कार्यपध्दती सदर विनियमाद्वारे निश्चित करण्यात येत आहे.

विनियमाचा तपशील

| अ.नं. | स्थानिक प्राधिकरण | ठराव क्र. | दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1. | अहमदनगर महानगरपालिका | | | |

**1. संक्षिप्त नाव व व्याप्ती :-**

I) या विनियमास "महानगरपालिका अहमदनगर लेखा परीक्षा विनियम – 2016" असे म्हणावे.

II ) व्याप्ती :- सदर विनियम अहमदनगर महानगरपालिके अंतर्गतच्या सर्व विभाग, प्रभागांना लागू राहतील.

2. **व्याख्या** :- या विनियमात, विषयात किंवा संदर्भात काहीही प्रतिकूल नसेल तर,

अ) "अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सुधारित) 2012 होय.

ब) "स्थानिक प्राधिकरण" म्हणजे अहमदनगर महानगरपालिका होय.

क) "मुख्य लेखा परीक्षक" म्हणजे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2012चे कलम45 (अ) अन्वये राज्य शासनाने महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील उपसंचालक दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा प्रतिनियुक्तीने नियुक्त केलेला योग्य अधिकारी होय.

ड) "लेखा परीक्षक" म्हणजे अधिनियम व या विनियमाअन्वये असलेली लेखा परीक्षेची कामे करण्यास मुख्य लेखा परीक्षकांनी नेमुन दिलेली कोणतीही व्यक्ती.

3. मुख्य लेखापरीक्षक यांचे संवैधानिक लेखापरीक्षण आणि लेख्यांची छानना, तपासणी ही खालील नमुद लेखापरीक्षण पध्दतीनुसार असेल.

<u>मुख्य लेखापरीक्षक यांचे लेखापरीक्षण व लेख्यांची तपासणी</u>:-

मुख्य लेखापरीक्षक यांचे संवैधानिक लेखापरीक्षण व विविध लेखे, अभिलेखो, पत्रव्यवहार, प्रस्ताव यांची तपासणी / छानना ही खालील प्रकारच्या लेखा परीक्षण पध्दतीने सिमित असेल

अ) महानगरपालिकेच्या लेखे, अभिलेख्यांची तपासणी ही अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत करण्यात येईल. लेख्यांचे, जमा संवितरीत रकमांचे लेखापरीक्षण हे समवर्ति कार्योत्तर लेखा परीक्षण पध्दतीने करण्यात येईल. मुख्यलेखाअधिकारी आहरण व संवितरण अधिकारी यांच्या स्वाक्षरीने दैनंदिन लेखे बंद करून स्वाक्षांकित झाल्यानंतर लेखापरीक्षणास सादर करण्यात येतील. मासिक ताळमेळ विवरणपत्र लेख्यात सक्षम प्राधिका-यांच्या

स्वाक्ष-यांसह नोंदविण्यात येईल.

ब) महानगरपालिकेच्या देयकाचे व वित्तीय प्रस्तावांचे लेखापरीक्षण पूर्व लेखापरीक्षण पध्दतीने करण्यात येईल. देयकांच्या पूर्व लेखापरीक्षणाची कार्यवाही म्हणून महानगरपालिकेच्या सर्व विभागांकडील वित्तीय प्रस्ताव प्रशासकीय मान्यता, खर्चास मान्यता, निविदा प्रक्रिया, खरेदी प्रक्रिया स्तरावर खाते प्रमुख / विभाग प्रमुख लेखापरीक्षणास सादर करतील व सादर प्रस्तावाची छाननी / तपासणी करून प्रस्ताव देयके विभागाकडे परत करण्यात येतील. विभागांकडून सक्षम प्राधिका-यांच्या मंजु-या, अभिप्राय घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

क) संवैधानिक लेखापरीक्षण केल्याशिवाय मुख्य लेखाअधिकारी यांचेकडून कोणत्याही मागणी / देय रकमेची अदायगी केली जाणार नाही. विभाग प्रमुखांनी प्रत्येक मागणी / देयकाचे पूर्व लेखापरीक्षण करून घेण बंधनकारक राहील.

ड) महानगरपालिकेच्या महसुलातून झालेला खर्च, उसनवारी कामासाठी झालेला खर्च महापालिकेच्या विशेष निधीतून झालेला खर्च समवर्ती चाचणी लेखा परीक्षण पध्दतीने करण्यात येईल.

इ) ऋण, ठेवी, कर्ज निवारण निधी, आगाउ रकमा, निलंबन लेखाशिर्ष, वित्तप्रेषण व्यवहार, लेख्यांमधील शिल्लक रकमांच्या पडताळणीचा निकाल, कार्यवाही या विषयी लेखा परीक्षण करून स्थायी समितीस अहवाल सादर करण्यात येईल.

फ) मा.महासभा अथवा स्थायी समितीच्या निर्देशानुसार परिवहन निधी,जल, मलप्रवाह निधी, पाणीपुरवठा कर्ज निधीचे विशेष लेखा परीक्षण अथवा तपशीलवार लेखा परीक्षण करण्यात येईल.

4. उपरोक्त लेखापरीक्षण पध्दती व लेख्यांची छाननी, तपासणी ही महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सुधारित) 2012 मधील अनुसुचि 'ड' प्रकरण 3(2) नियम 9 नुसार मुख्य लेखापरीक्षक यांनी त्यांच्या प्राप्त संवैधानिक अधिकारात निश्चित केलेल्या नियम, पध्दती/रीत, व्याप्ती प्रमाणे करण्यात येईल.

5. अधिनियमान्वये, या विनियमान्वये करावयाचे कोणत्याही लेखा परीक्षेच्या प्रयोजनार्थ मुख्य लेखापरीक्षकास आवश्यक वा□ल अशा सर्व लेख्यांची किंवा त्यांच्या कोणत्याही भागाची लेखा परीक्षा, ज्या कार्यालयामध्ये असे लेखे ठेवण्यात आले आहेत / तयार करण्यात आले आहेत त्या कार्यालय, विभाग, प्रभागांमध्ये करणे इष□ वा□त असेल तर; ते लेखे, अभिलेखे, पुस्तके, कागदपत्रे, पत्रव्यवहार किंवा कोणताही दस्तऐवज सर्व वाजवी वेळी संबंधित विभाग प्रमुख, प्राधिकारी यांनी उक्त कार्यालयात पाहणी, छाननीसाठी उपलब्ध करून देण्यात आला पाहिजे आणि विहित मुदत देवून ते मुदतीत उपलब्ध करून देण्याबाबत आज्ञापत्राद्वारे संबंधित प्राधिका-यास मुख्य लेखापरीक्षकास फर्मावता येईल व लेखापरीक्षा, छाननी, तपासणीसाठी संबंधित प्राधिका-यांनी ती विनाविलंब तयार ठेवली पाहिजे.

6. लेखापरीक्षणाकरीता मुख्य लेखापरीक्षकास इष□ वा□त असेल तर असे सर्व लेखे, अभिलेखे, पुस्तके, दस्तऐवज त्याच्या पाहणीसाठी पाठविणेबाबत फर्मावता येईल. व ती विनाविलंब पाठविली गेली पाहिजेत.

7. लेखापरीक्षा, छाननी स्वत:च्या कार्यालयात अथवा जेथे ते तयार करण्यात आले, ठेवण्यात आले त्याठिकाणी करण्याची मुख्य लेखापरीक्षकास मुभा राहिल किंवा त्याच्या नियंत्रणाखालील लेखापरीक्षकाकडून लेखापरीक्षा, छाननी करून घेण्याची मुभा राहिल.
8. लेखा परीक्षण, लेख्यांची छाननी, तपासणी या प्रयोजनासाठी स्थायी समितीस आणि मुख्य लेखापरीक्षकास महानगरपालिकेची सर्व लेखे त्यासंबंधीचे सर्व अभिलेखे व पत्रव्यवहार पाहण्याची मुभा राहिल आणि जमा रकमा, संवितरीत रकमांच्या संदर्भात जो कोणताही खुलासा स्थायी समिती किंवा मुख्यलेखापरीक्षक मागवतील तो; आयुक्त यांनी त्यास ताबडतोब दिला पाहिजे.
9. चलन, देयके, प्रमाणके, विवरणपत्रे, पत्रव्यवहार, टिपण्या किंवा इतर दस्तऐवज याबद्दल जबाबदार असणारा किंवा ते ज्यांच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असतील अशा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही वेतनी सेवकास किंवा स्थानिक प्राधिकरणाबरोबर किंवा त्याच्या मार्फत केलेल्या कोणत्याही करारात प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे त्याच्या स्वत:चा किंवा त्याच्या भागीदाराचा कोणताही हितसंबंध किंवा हिस्सा असलेले कोणत्याही व्यक्तीस कार्यालयात जातीने हजर राहून आक्षेपांचे निराकरण, प्रश्नांची मिळवणूक करण्यास मुख्य लेखापरीक्षकास फर्मावता येईल व त्या व्यक्तीने समर्थन, स्पष्टीकरण सविनय प्रशासनिक भाषेने दिले पाहिजे.
10. जेथे अभिलेखे ठेवण्यात आले आहेत तेथे लेखापरीक्षा, छाननी करावयाची असल्यास भेट देण्यात येणा-या खाते / विभाग प्रमुख, नियंत्रक अधिका-याने शांतपणे, व्यवस्थितरित्या लेखापरीक्षा होण्याच्या दृष्टीकोनातून वाजवी बैठक व्यवस्था, उपाययोजना करून आवश्यक त्या सुविधा तात्काळ पुरविल्या पाहिजेत.
11. मुख्य लेखापरीक्षकाच्या नियंत्रणाखालील लेखापरीक्षक, लिपिक, शिपाई, वाहनचालक यांचे दैनंदिन कामकाज अधिनियमातील तरतुदीनुसार मुख्य लेखापरीक्षकाच्या कार्यालयीन आदेशाद्वारा नियंत्रित होईल व त्यांच्या संपूर्ण कामकाजावर मुख्यलेखापरीक्षक यांचे पर्यवेक्षण व नियंत्रण राहील. मुख्य लेखापरीक्षक आदेशित करतील त्या नमुन्यात व मुदतीत लेखापरीक्षकाने साप्ताहिक, दैनंदिन कामकाजाचा अहवाल / गोषवारा आक्षेपाचे विवरणपत्र त्यांना सादर करणे बंधनकारक राहील.
12. मुख्य लेखापरीक्षकांनी निदर्शनास आणून दिलेल्या त्रुटी, आक्षेप, ज्ञापन, त्रुटीपत्रकावर विभाग प्रमुख, खातेप्रमुख, सक्षम प्राधिकारी यांचेकडून विनाविलंब खुलासा करून ज्ञापनाच्या उत्तरी अनुपालनासमवेत आवश्यक स्वाक्षांकित दस्तऐवज मुख्यलेखापरीक्षकास सादर करण्यात येईल. अभिलेखे विनाविलंब उपलब्ध करून न दिल्यास त्याचे लेखी स्पष्टीकरण तात्काळ मुख्य लेखापरीक्षकास दिले पाहिजे. अशी कार्यवाही न केल्यास आवश्यक त्या प्रशासनिक कार्यवाहीकरीता मुख्य लेखापरीक्षकाकडून स्थायी सभेस कळविण्यात येईल.
13. विभाग प्रमुख, खाते प्रमुख, सक्षम प्राधिकारी यांच्या प्राप्त खुलासा, अनुपालनांवर खुलासा, अनुपालने असमाधानकारक असल्यास केलेली कार्यवाही परिपूर्ण, नियमानुकुल नसल्यास मुख्य लेखापरीक्षकास आणखी खुलासा करण्यास फर्मावता येईल व असा खुलासा विनाविलंब करण्यात येईल.

14. आक्षेप ज्ञापनाचे उत्तरी सादर केलेले अनुपालन, खुलाशाबाबतीत मुख्य लेखापरीक्षकाकडून खालील कार्यवाही करण्यात येईल.

अ) आयुक्त, विभाग प्रमुख, खाते प्रमुख, सक्षम प्राधिकारी यांनी सादर केलेले अनुपालन, खुलासा समाधानकारक असल्यास मान्य होउन आक्षेप वगळण्यात येईल.

ब) त्रुटी अनियमितता, आक्षेपांचे निराकरण, अनुपालन खुलाशाअंती होत नसल्यास, आवश्यक त्या पुढील उपाययोजना, प्रशासनिक कार्यवाही होणेकरीता मुख्य लेखापरीक्षक सदर बाबी स्थायी समितीचे / महासभेच्या निदर्शनास आणून देईल.

15. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2012 चे कलम 106 (2)/(3) नुसार जी बाब महानगरपालिकेपुढे ठेवण्याविषयी मुख्य लेखापरीक्षक स्थायी समितीस सांगेल अशी कोणतीही बाब अशा अहवालावर किंवा विवरणपत्रावर स्थायी समितीने कोणते आदेश दिले पाहिजेत हे नमुद करून समिती अशी बाब महासभेपुढे ठेवण्याची व्यवस्था करेल व महासभा पुर्वोक्त बाबींसंबंधी तिला आवश्यक वाटेल ती उपाययोजना करेल.

16. लेखापरीक्षण कामकाजा दरम्यान सकृत दर्शनी निदर्शनास आलेल्या गंभीर अनियमितता, अपहार हा स्थायी समितीसमोर अहवालाद्वारे ठेवण्यात येईल व स्थायी समिती प्रस्तुत बाबींवर आवश्यक त्या उपाययोजना करेल. अशा बाबी सखोल चौकशी, प्रशासकीय, विभागीय चौकशी, न्यायिक चौकशी, न्यायिक, प्रशासनिक कार्यवाहीकरीता गोपनियरित्या आयुक्ताच्या निदर्शनास आणून देण्यात येतील.

17. महानगरपालिकेच्या आर्थिक हितास बाधा आणणा-या गंभीर बाबी, संशयित अप्रामाणिक कार्यवाही गैरप्रशासकीय कार्यवाही च्या बाबी आवश्यक त्या उपाययोजनांकरीता गोपनीयरीत्या मुख्य लेखापरीक्षकाकडून स्थायी समिती, महासभेच्या निदर्शनास आणण्यात येतील.

18. महानगरपालिकेच्या जमा, खर्चाच्या रकमेच्या मागील आर्थिक वर्षाचा वार्षिक लेखा आयुक्ताकडून प्राप्त झाल्यानंतर, मुख्य लेखापरीक्षकाकडून लेखापरीक्षण करण्यात येउन स्थायी समितीस अहवाल सादर केला जाईल.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2012 चे कलम 106 नुसार "मुख्य लेखापरीक्षकाचा अहवाल" स्थायी समितीकडे सादर केला जाईल. स्थायी समितीकडून सदरचा अहवाल मुख्य लेखापरीक्षकाकडे अनुपालने सादर करणेस्तव आयुक्त यांचेकडे पाठविण्यात येवून अहवालावर "केलेल्या कार्यवाहीचा अहवाल" आयुक्त आगामी स्थायी समिती समोर सादर करतील. मुख्य लेखापरीक्षकाच्या अहवालातील आक्षेपांबाबतची अनुपालने आयुक्त, संबंधित विभाग प्रमुखांकडून प्राप्त करून आपल्या स्वाक्षरीने मुख्य लेखापरीक्षकास सादर करतील. अहवालावरील प्रथम अनुपालन अहवाल, स्थायी समितीकडून प्राप्त झाल्यानंतर तीन महिन्यात आयुक्तांकडून मुख्य लेखापरीक्षकास सादर करण्यात येईल.

19. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2012 कलम 106 (4) नुसार मुख्य लेखापरीक्षकाचा अहवाल छापून सदस्यांना पोहचविण्याची व्यवस्था आयुक्ताकडून करण्यात येईल.

20. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2012 मधील कलम 47 (1) (क) अन्वये मुख्य लेखापरीक्षक यांच्या सोयीसुविधा, वाहनव्यवस्था, लेखापरीक्षक, लिपिक कर्मचारी यांच्या सेवा, पारीश्रामिक, विशेष अधिकार यासंबंधी सर्व प्रश्नांची सोडवणूक, सोयी सुविधा संबंधी प्रशासन विनाविलंब कार्यवाही करेल.

21. महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाचा अहवाल हा स्थायी समितीशी विचारविनिमय करून अहवाल तयार करण्याची रीत, नमुना आणि अहवाल समाविष्ठ करावयाच्या गोष्�ी खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.मुख्य लेखापरीक्षकाचा अहवाल भाग-1 :- मागील प्रलंबित आक्षेप.भाग-2 :-

1) अर्थसंकल्पावरील आक्षेप / अभिप्राय (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2012 कलम 106 अन्वये)

2) वार्षिक लेखा विवरणपत्र तपासणे (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2012 कलम 106, अनुसुची 'ड' प्रकरण 3 (2) नियम 3 अन्वये)

3) वार्षिक प्रशासन अहवाल (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2012 कलम 104 अन्वये)

4)ऋण, ठेवी, कर्ज / व्याज निवारण निधी (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2012 अनुसुची 'ड' प्रकरण 3 (2) नियम 5(2) अन्वये)

5) उसनवारी कामासाठीचा खर्च, विशेष निधीतील खर्च (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2012 अनुसुची 'ड' प्रकरण 3(2) नियम 5)

6) इतर महत्वाच्या त्रु�ी, आक्षेप.

22. 1) चाचणी लेखापरीक्षण – मा.महालेखापाल, कंट्रोलर ऑडी�र जनरल, स्थानिक निधी लेखा कार्यालयांकडून राष्ट्रीय नगरपरिषद लेखासंहिता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2012 कलम 108 (1) (2) व शासन नियमांनुसार करण्यात येईल.

2) मुख्य लेखापरीक्षक यांच्या लेखापरीक्षणा व्यतिरिक्त, निधी, कर्ज देणा-या बाहय प्राधिकरणांकडून त्यांचे पध्दतीनुसार लेखापरीक्षण करण्यात येईल. (राष्ट्रीय नगरपरिषद लेखासंहिता 2004).

3) राष्ट्रीय नगरपरिषद लेखासंहिता 2004 अन्वये मुख्य लेखापरीक्षक यांच्या संवैधानिक लेखापरीक्षणा व्यतिरिक्त शासन / अहमदनगर महानगरपाकलिकेस खालील प्रकारचे लेखापरीक्षण अतिरिक्तरित्या स्वयंत्रणेकडून अथवा अन्य यंत्रणेकडून करता येईल.
अंतर्गत लेखा परीक्षण -
विशेष / सखोल लेखापरीक्षण

4) शासनाकडील विशेष लेखापरीक्षण: महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2012 कलम108 (1)(2) अन्वये करण्यात येईल.

5) राज्य शासन वित्त विभाग स्थानिक निधी लेखा यांची लेखापरीक्षा -महाराष्ट्र मनपा अधिनियम 2012चे क 107(अ) अन्वये करण्यात येईल.

23. निरसन व व्यावृत्ती:- सदर विनियम अंमलात येण्यापूर्वी यासंबंधात अस्तित्वात असणा-या नियम, विनियम सदर विनियम अंमलात आल्याच्या दिनांकापासून अधिक्रमित होतील.

सभापती
स्थायी समिती
महानगरपालिका अहमदनगर

# ***महानगरपालिका अहमदनगर लेखा परीक्षा नियम २०१६***

(२१ मार्च २०१६)

***सदरचे नियम*** : पुढील आदेश व अधिनियम या अन्वये करण्यात आलेले आहेत.

सन १९४९ चा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम

सन २०१२ चा सुधारित महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम

राष्ट्रीय नगरपरिषद लेखा संहीता - २००४

मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा नियम - १९३१ (महाराष्ट्र शासन, वित्त विभाग )

ज्याअर्थी, महानगरपालिका अहमदनगर या स्थानिक प्राधिकरणाच्या व्यवस्थापना खाली किंवा नियंत्रणखाली असलेल्या स्थानिक निधींची लेखापरीक्षा करण्यासाठी नियम करणे व अशा लेखापरीक्षेची लेखापरीक्षण पध्दती, व्याप्ती ठरविणे यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ मधील अनुसूची ड, प्रकरण ३ (२) मधील नियम क्र. ९ नुसार महानगरपालिकेच्या लेख्यासंबंधी सर्व बाबतीत विशेषतः लेखापरिक्षणाची पध्दती व व्याप्ती, आक्षेप घेणे व त्यांचे निरसण करवुन घेणे या विषयी नियम तयार करणे ईष्ट आहे,

त्याअर्थी या द्वारे प्राप्त संवैधानिक अधिकारात पुढीलप्रमाणे लेखापरिक्षा नियम तयार करण्यात येत आहेत.

**१.** ***संक्षिप्त नांव :*** या नियमांना "अहमदनगर महानगरपालिका लेखपरीक्षा नियम - २०१६" असे म्हणावे.

***व्याप्ती :*** सदर लेखापरीक्षा नियम अहमदनगर महापालिकेतील सर्व विभाग व प्रभागांना लागू राहतील.

**२.** ***व्याख्या :*** या नियमात, विषयात किंवा संदर्भात काहीही प्रतिकूल नसेल तर,

**अ) अधिनियम :** अधिनियम म्हणजे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ होय.

**ब) स्थानिक प्राधिकरण :** स्थानिक प्राधिकरण म्हणजे अहमदनगर महानगरपालिका होय.

**क) मुख्यलेखापरीक्षक :** मुख्यलेखापरीक्षक म्हणजे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ चे कलम ४५ (अ) अन्वये राज्य शासनाने महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील उपसंचालक दर्जा पेक्षा कमी दर्जा नसेल असा प्रतिनियुक्तीने नियुक्त केलेला सक्षम अधिकारी.

**ड) लेखापरीक्षक :** लेखापरीक्षक म्हणजे या नियमान्वये असलेली लेखपरीक्षेची कामे करण्यास मुख्यलेखापरीक्षक यांनी नेमलेली कोणतीही व्यक्ती.

**इ) पूर्व लेखापरीक्षण :** मागणी, देयक अदायगी पूर्वीचे लेखपरीक्षण.

**ई) कार्योत्तर लेखापरीक्षण :** देयक अदायगी नंतरचे मागील आर्थिक वर्षाच्या, आर्थिक वर्षातील लेख्यांचे लेखापरीक्षण.

**फ) विशेष / खास लेखापरीक्षण :** विशेष / खास लेखपरीक्षा म्हणजे परिपूर्ण व सुक्ष्म लेखापरीक्षेची आवश्यकता असलेल्या विनिर्दिष्ट बाबीची किंवा बाबींची लेखापरीक्षा.

**ग) तपशिलवार लेखापरीक्षण :** लेख्यांचे पुर्ण आर्थिक वर्षभराचे सखोल लेखापरीक्षण.

**घ) समवर्ती लेखापरीक्षण :** ठराविक कालांतराने करण्यात येणारे समवर्ती लेखापरीक्षण.

**ड) स्थानिक निधी :** स्थानिक निधी म्हणजे ज्या निधीवर नियंत्रण ठेवण्याचा किंवा ज्याची व्यवस्था पाहण्याचा अहमदनगर महानगरपालिकेस कायदेशीररीत्या हक्क आहे असा कोणताही निधी आणि त्यात अशा प्राधिकरणास जो बसविण्याचा कायदेशीरपणे हक्क आहे असा कोणताही उपकर, पट्टी, शुल्क किंवा कर यांच्या उत्पनाचा आणि अशा प्राधिकरणात निहित असलेल्या कोणत्याही मालमत्तेचा समावेश होतो.

**३.** ***लेखापरीक्षाकाकडुन लेख्यांचे लेखापरीक्षण :*** महाराष्ट्र महापालिका अधिनियम २०१२ चे कलम १०५ अन्वये स्थानिक प्राधिकरणाच्या देयकांचे, लेख्यांचे लेखापरीक्षण हे मुख्य परीक्षक यांच्या नियंत्रणाखाली

४. लेखापरीक्षक यांचेकडुन व मुख्य लेखापरीक्षक यांचेकडुन त्यांचे मार्गदर्शन व नियंत्रणाखाली करण्यात येईल.

५. ***दस्तऐवज सादर करण्यास फर्माविण्याचा लेखापरीक्षकाचा अधिकार :***

**अ)** या प्रायोजनासाठी स्थायी समिती व महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकास महानगरपालिकेचे सर्व लेखे व त्या संबंधीचे सर्व अभिलेखे, पत्रव्यवहार पाहाता येईल आणि स्थायी समिती किंवा मुख्यलेखापरीक्षक जमा आणि संवितरीत रकमा या संबंधी जो जो कोणताही खुलासा मागवतील तो आयुक्तांनी त्यास ताबडतोब दिला पाहिजे.

**ब )** मुख्यलेखापरीक्षकास ज्या कार्यालयामध्ये लेखे तयार करण्यात आले आहेत, ठेवण्यात आले आहेत त्या कार्यालयामध्ये, प्रभागा, विभागामध्ये करणे ईष्ट वाटत असेल तर, ते लेखे व त्या संबंधीत असलेली सर्व पुस्तके, कागदपत्रे, अभिलेख सर्व वाजवी वेळी उक्त कार्यालयात पाहणीसाठी उपलब्ध करु द्यावी असे फर्माविता येईल.

**क)** ज्या लेख्यांची लेखापरीक्षा करणे आवश्यक आहे त्या लेख्यांशी संबंधीत असलेली कोणतीही पुस्तके, दस्तऐवज त्यासाठी पाहणीसाठी पाठविण्यात यावी, असे फर्माविण्याचा अधिकार मुख्यलेखापरीक्षकास असेल.

६. ***फर्माविण्यात येतील अशी माहिती सादर करणे :*** मुख्यलेखापरीक्षकाकडुन, फर्माविण्यात आलेली लेखपरीक्षणासंबंधीची सर्व माहिती विभाग प्रमुख, खाते प्रमुख, नियंत्रक अधिकारी यांचेकडुन विनाविलंब सादर करण्यात येईल.

७. ***लेखापरीक्षण कार्यालयीन वेळेत करणे :*** मुख्यलेखापरीक्षक व त्यांचे अधिनस्त लेखपरीक्षक यांचेकडुन कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत लेखपरीक्षण करण्यात येईल.

८. ***लेखापरीक्षणास्तव कार्यालयांतर्गत बैठक व्यवस्था करणे :*** मुख्यलेखापरीक्षकास इतर कार्यालयाच्या ठिकाणी लेखपरीक्षण करणे ईष्ट वाटत असेल तर विभाग प्रमुख, खाते प्रमुख, नियंत्रण अधिकारी यांचेकडुन सुव्यवस्थित व पुरेशी बैठक व्यवस्था करण्यात येवुन आवश्यक त्या सोयीसुविधा तात्काळ उपलब्ध करुन देण्यात येतील.

९. ***गोपनिय कागदपत्रे उघड होवु न देणे :*** कागदपत्रे गोपनिय स्वरुपाचे असतील तर लेखापरिक्षकांकडुन त्यातील मजकूर उघड न होण्याची दक्षता घेण्यात येईल.

१०.***मुख्य लेखापरीक्षक यांचे लेखापरिक्षण व लेख्यांची तपासणी :*** मुख्य लेखापरीक्षक यांचे संवैधानिक लेखापरीक्षण व विविध लेखे, अभिलेखे, पत्रव्यवहार, प्रस्ताव यांची तपासणी / छाननी ही खालील प्रकारच्या लेखापरीक्षण पध्दतीने करण्यात येईल.

**अ)** महानगरपालिकेच्या लेखे, अभिलेख्यांची तपासणी ही अधिनियमांद्वारे विहित केलेल्या मुदतीत करण्यात येईल. लेख्यांचे, जमा, संवितरीत रकमांचे लेखापरीक्षण हे समवर्ती कार्योत्तर लेखापरीक्षण पध्दतीने करण्यात येईल. मुख्यलेखाधिकारी, आहरण व संवितरण अधिकारी यांचे स्वाक्षरीने दैनंदिन लेखे बंद करुन स्वाक्षांकीत झाल्यानंतर लेखापरिक्षणास सादर करण्यात येतील. मासिक ताळमेळांचे विवरण पत्रे लेख्यात सक्षम प्राधिका-याच्या स्वाक्षा-यांसह नोंदविण्यात येईल.

**ब)** महानगरपालिकेच्या देयकांचे, वित्तीय प्रस्तावांचे लेखापरीक्षण हे पूर्व लेखापरीक्षण पध्दतीने करण्यात येईल. देयकांच्या पूर्व लेखपरीक्षणाची कार्यवाही म्हणून महानगरपालिकेच्या सर्व विभागाकडील वित्तीय प्रस्ताव, प्रशासकीय मान्यता, खर्चास मान्यता, निविदा प्रक्रिया, खरेदी प्रक्रिया इत्यादी स्तरावर खाते प्रमुख / विभाग प्रमुख लेखा परीक्षणास सादर करतील व सादर प्रस्तावांची छाननी

/ तपासणी झाल्यानंतर प्रस्ताव, देयके सबंधीत विभागाकडे परत करण्यात येतील. विभागाकडुन सक्षम प्राधिका-यांच्या मंजू-या, अभिप्राय घेणेची कार्यवाही करण्यात येईल.
विविध विभागांकडून सादर होणा-या कंत्राट बांधकामे, सेवा, पुरवठा देयकासोबत लेखापरीक्षण विभागाकडून देयक तपासणी सूची व प्रदानाचा तपशील जोडण्यात येईल.
**क)** संवैधानिक लेखापरीक्षण केल्या शिवाय मुख्यलेखाधिकारी यांच्याकडुन कोणत्याही मागणी / देयकांची अदायगी केली जाणार नाही. विभाग प्रमुखांनी मागणी / देयकाचे पूर्व लेखापरिक्षण करुन घेणे बंधनकारक राहील.
**ड)** महानगरपालिकेच्या महसूलातुन झालेला खर्च, उसनवारी कामांसाठी झालेला खर्च, महापालिकेच्या विशेष निधीतून, राखीव निधीतून केलेला खर्च समवर्ती चाचणी लेखापरीक्षण पध्दतीने करण्यात येईल.
ऋण, ठेवी, कर्ज निवारण निधी, आगाउ रकमा, निलंबन लेखा, वित्तप्रेषण व्यवहार, लेख्यामधील शिल्लक रकमांच्या पडताळणीचा निकाल, कार्यवाही या विषयी लेखापरीक्षण करुन अहवाल स्थायी समितीस सादर करण्यात येईल.
**इ)** मा. महासभा अथवा स्थायी समितीच्या निर्देशानुसार जल, मल प्रवाह निधी, पाणी पुरवठा कर्ज निधीचे विशेष लेखापरीक्षण अथवा तपशीलवार लेखापरीक्षण करण्यात येईल.
**फ)** प्रचलित शासन नियमानुसार मुख्यलेखापरीक्षक, लेखापरीक्षक यांचेकडुन हिरव्या रंगाच्या शाईने लेखापरीक्षण त्रुटी, अभिप्राय नोंदविण्यात येतील.
***११.मनपा निधीतुन झालेला खर्च ना मंजूर करणे :*** महानगरपालिकेच्या महसूलातुन झालेला खर्च ना मंजूर करणे बाबत, अशा खर्चावरील आक्षेपांचे निरसण करणे बाबतची कार्यपध्दती "अहमदनगर महानगरपालिका लेखापरिक्षा विनियमाद्वारे " विहित केल्या प्रमाणे असतील.
***१२. लेखापरीक्षा आक्षेप, अभिप्राय कळविण्याची कार्यपध्दती :*** लेखापरीक्षा आक्षेप ज्यास उद्येशुन केलेला असेल त्या अधिका-यांनी किंवा प्राधिका-याने विलंब न लावता आक्षेपावरील अनुपालन किंवा खुलासा आवश्यक ती प्रमाणके कागदपत्रे किंवा स्पष्टी करणे यासह मुख्यलेखापरीक्षकास कळविला पाहिजे.
प्रस्तावांच्या पुर्व लेखापरीक्षण छाननी अंती विभाग प्रमुखाकडील प्राप्त संचिकेत आक्षेप अभिप्राय कळविण्यात येतील. देयकांचे पुर्व लेखपरीक्षण, छाननी अंती विभाग प्रमुखांकडील प्राप्त देयकासोबत त्रुटी पत्रकाद्वारे त्रुटी / आक्षेप कळविण्यात येतील.
लेख्यांच्या समवर्ती कार्योत्तर लेखपरिक्षण, छाननी अंती त्रुटी पत्रकाद्वारे आक्षेप, अभिप्राय संबंधतीत अधिका-यास कळविण्यात येतील. त्रुटी पत्रक या नियमातील परिशिष्ट क्र. १ मधील नमुना नं. १ प्रमाणे असेल
लेखापरिक्षकाकडुन दिनांक, विभाग, प्रस्ताव / विषय व त्रुटी नमुद करुन विभाग निहाय त्रुटीपत्रके निर्गमित करण्यात येईल.
***१३.आक्षेपाचे अनुपालन करणे :*** महानगरपालिकेच्या मुख्य लेखा परीक्षकास ज्या कोणत्याही लेख्यांची लेखापरिक्षा करणे त्यास आवश्यक वाटेल त्या लेख्यांच्या संबंधात त्यास योग्य वाटेल अशी विचारणा करता येईल आणि अशा लेख्यांच्या संबंधात त्यास योग्य वाटतील अशी प्रामाणके कागदपत्रे किंवा स्पष्टी करणे मागवता येतील. पुर्वोक्त अशी प्रत्येक विचारणा किंवा अभिप्राय ज्यास उद्येशुन केलेला असेल त्या अधिका-यांनी किंवा प्राधिका-याने त्यावर ताबडतोब विचार केला पाहिजे आणि विलंब न लावता आवश्यक ती प्रमाणके कागदपत्रे किंवा स्पष्टी करणे मुख्य लेखापरीक्षकास दिली पाहिजेत.

विभागप्रमुखांनी अनुपालनामध्ये उचित प्रशासनिक शब्दप्रयोग करुन अनुपालन सादर करणे आवश्यक राहील.

१४.***आक्षेपाचे अनुपालन न करणेबाबतची कार्यवाही :*** विभाग प्रमुखांकडुन विलंबाने अनुपालन झाल्यास, अनुपालन न झाल्यास, अशासकीय गैरशब्द प्रयोग वापरुन अनुपालन झाल्यास प्रस्तुत नियमाचा व प्रशासनिक औचित्याचा भंग ठरुन योग्य त्या प्रशासनिक कार्यवाही बाबत आयुक्त यांना व स्थायी समितीस कळविण्यात येईल.

***१५.आढळुन आलेल्या गंभीर आक्षेप, अनियमितता, अपहार कळविणे :*** लेखपरीक्षणा दरम्यान आढळुन आलेले गंभीर आक्षेप, अनियमितता, अपहार मा. स्थायी समिती, मा. महासभा यांना गोपनियरित्या कळविण्यात येईल तसेच सकृतदर्शनी निर्देशनास आलेल्या गंभीर अनियमितता, अपहार, गोपनियरित्या पुढील सखोल चौकशी, न्यायिक, प्रशासनिक कार्यावाहीस्तव आयुक्त यांना कळविण्यात येईल.

***१६.वार्षिक लेख्यांचे लेखपरीक्षण :*** वार्षिक लेख्यांच्या लेखापरीक्षण अंती मुख्यलेखापरीक्षक यांचे प्रमाणपत्र मुख्यलेखाधिकारी यांनी घेणे बंधनकारक राहील.

***१७.मुख्य लेखा परीक्षकाचा अहवाल :*** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ चे कलम १०६ अन्वये "अहमदनगर महानगरपालिका लेखपरीक्षा विनियम" द्वारा विहित करण्यात येईल त्यानमुन्यात मा. स्थायी समितीस पुढील कार्यवाहीस्तव सादर करण्यात येईल.

दि.१९/०३/२०१६

मुख्यलेखापरीक्षक
महानगरपालिका अहमदनगर

येणे प्रमाणे मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अहवाल असे.

यावर मा.सभापती स्थायी समिती अहमदनगर महानगरपलिका यांचा अभिप्राय कि, नगरसचिव,स्थायी समिती समोर विचारार्थ ठेवावे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---****---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब **:-** महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारीत)अधिनियम २०१२ चे कलम ४६५ अन्वये महानगरपालिका अहमदनगर लेखापरिक्षा विनिमय - २०१६ बाबत प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्या प्रमाणे सभेमध्ये आफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- ऑफीस रिपोर्ट मंजुर करावा.

मा.सौ.रूपाली वारे :- ऑफीस रिपोर्ट मंजुर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-** सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार "महानगरपालिका अहमदनगर लेखा परीक्षा नियम २०१६" अवलोकन करण्यात आले.आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारीत)अधिनियम २०१२ चे कलम ४६५ (२)अन्वये तयार करण्यात आलेल्या"महानगरपालिका अहमदनगर लेखापरिक्षा विनिमय- २०१६ "यांस ही सभा मान्यता देत आहे. सदरील विनियम सन २०१६-१७ पासून अंमलबजावणीच्या प्रयोजना करीता मा.महासभे समोर मान्यतेस्तव सादर करण्यास ही सभा मान्यता देत आहे. नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.श्रीपाद छिंदम सही /-

अनुमोदक :- मा.सौ.रूपाली वारे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०१**

विषय क्रमांक- ०६ सोमवार दि.२५/४/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञांच्या पॅनलमध्ये डॉ.श्री.कृष्णा जी.अनारसे यांचा कॉल बेसीसवर समाविष्ट करणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की ,मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा.यांनी त्यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे.दवा.व सुतीका गृह १००२ दिनांक २५/०१/२०१६ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये मा.स्थायी समिती ठराव क्र.१२६ दि.१६/१२/२०१४ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेमधील कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतीका गृह येथे रुग्णांच्या दैनंदिन ऑपरेशन कामी शहरातील १३ भुलतज्ञांना तात्पुरत्या स्वरुपात भुलतज्ञ म्हणुन प्रत्येक मायनर ऑपरेशन करीता रुपये ५००/- (रु.पाचशे फक्त) , प्रत्येक मेजर ऑपरेशन करीता रु १०००/- (रु.एक हजार फक्त) व नाईट ॲण्ड हायरिक्स केसेस करीता रु १५००/- (रु.एक हजार पाचशे फक्त) यावर दिनांक ६/०७/२०१४ ते ०५/०७/२०१७ अखेर तीन वर्षा करिता पॅनलशिपवर करारबध्द करण्यात आलेले आहे. तद्नंतर डॉ.श्री.कृष्णा जी. अनारसे (M.B.B.S. D.A.C.P.S.) यांनी भुलतज्ञ म्हणुन कॉल बेसीसवर काम करण्यास तयार असले बाबत दिनांक ११/०१/२०१६ रोजी कै.बा.दे. दवाखाना येथे विनंती अर्ज केलेला आहे. तरी श्री.कृष्णा जी. अनारसे , भुलतज्ञ यांच्या विनंती अर्जा नुसार त्यांना स्थायी समिती ठराव क्र. १२६ दिनांक १६/१२/२०१४ नुसार कराराच्या अटी व शर्तीवर सध्या भुलतज्ञांच्या पॅनलमध्ये समाविष्ट करणे उचित वाटते . " असे नमुद करुन सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा. यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे.दवा.व सुतीका गृह ३०१ दि.०५/०७/२०१४ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरुपात भुलतज्ञांची पॅनलशिपवर व्हिजीट बेसीसवर दि.०६/०७/२०१४ ते ०५/०७/२०१७ अखेर तीन वर्षा करिता करारबध्द नियुक्ती बाबत सुचित करण्यात आलेले होते. त्यानुषंगाने सदरचा प्रस्ताव जा.क्र.आस्था.वर्कशिट १६७ दि.१०/९/२०१४ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेले होता.

सदरच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १२६ दिनांक १६/१२/२०१४ अन्वये ठराव पारित करुन मान्यता दिल्यानुसार जा.क्र.आस्था. ८१३१ दिनांक २४/२/२०१५ अन्वये कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरुपात भुलतज्ञ डॉक्टर म्हणुन डॉ. सायंबर व इतर ११ यांची अटी व शर्तीनुसार प्रत्येक मायनर ऑपरेशन करीता रुपये ५००/- (रु.पाचशे फक्त) , प्रत्येक मेजर ऑपरेशन करीता रु. १०००/- (रु.एक हजार फक्त) व नाईट ॲण्ड हायरिक्स केसेस करीता रु १५००/- (रु.एक हजार पाचशे फक्त) यावर दिनांक ६/०७/२०१४ ते ०५/०७/२०१७ अखेर तीन वर्षा करिता पॅनलशिपवर व्हिजीट बेसीसवर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये **५३ :- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे** याबाबत नमुद केलेले आहे. (सोबत : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ तरतुद बाबतची छायांकित प्रत.)

मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा. यांचे संदर्भिय जा.क्र.कै.बा.दे.दवा.व सुतीका गृह १००२ दि.२५/०१/२०१६ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वस्प्रात भुलतज्ञ यापदी पॅनलशिपवर डॉ.श्री.कृष्णा जी. अनारसे यांची मा.स्थायी समिती ठराव क्र. १२६ दि.१६/१२/२०१४ अन्वये पारीत ठराव करुन मान्यता दिल्याच्या अनुषंगाने त्यानुसार सदर इतर कालावधी करीता दर्शविलेल्या व्हिजीट बेसीसवर मानधनानुसार पॅनलमध्ये समाविष्ट करणे बाबत निर्णय झाल्यास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी घेवुन अटी व शर्तीनुसार करारबध्द नियुक्तीबाबत कार्यवाही करणे उचित होईल. त्यामुळे सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीपुढे मंजुरी करिता निर्णयासाठी पाठविणे संयुक्तीक होईल.

तरी सदरचा प्रस्ताव मा.मुख्य लेखा परिक्षक व मा.मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय होवुन निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.प्र.सहा.आयुक्त यांची स्वाक्षरी

यावर मुख्यलेखाअधिकारी यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केले प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,विभागाने प्रस्तावित केलेनुसार निर्णयाकरीता मा.स्थायी समिती समोर पाठविणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय कि,Educational qualitficationतपासून अभिप्राय दयावेत,

यावर मुख्यवैदयकीय आरोग्य अधिकारी यांचा अभिप्राय की,डॉ.श्रीकृष्ण अनारसे हे Diploma in anasthesia ही पदव्यूत्तर पदविका anasthesiology (भुलशास्त्र) प्राप्त धारक असून महाराष्ट्र वैदयकीय कडे ७१७५२ नोंदणी क्रमांकाने नोंदणीकृत आहेत.सबब त्याना भुलतज्ञ म्हणून पॅनलशीप नियुक्त करणेस शिफारस आहे.तरी मान्यतेस्तव तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करणे योग्य.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

---****---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब **:-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञांच्या पॅनलमध्ये डॉ.श्री.कृष्णा जी.अनारसे यांचा कॉल बेसीसवर समाविष्ट करणेबाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववावा.

त्या प्रमाणे सभेमध्ये आफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :-हे सर्व व्यवस्थीत काम करतात का?

वैदयकीय आरोग्य अधिकारी श्री.राजूरकर :- हो व्यवस्थीत काम करतात.

मा.सभापती साहेब :- ऑटोमोबाईल इंजीनियर काम कसे करतात.पाणीपुरवठा विभागाचे काम महत्वाचे आहे.त्याकरीता पुरेसा कर्मचारी वर्ग आहे का.

मा.परिमल निकम,मेंकॅ.इंजी. :- ऑटोमोबाईल इंजीनीयर्स चांगले काम करतात.पाणी पुरवठा विभागाचे काम नियोजनपुर्वक सुरू आहे. पाणी पुरवठया कडे मानधन तत्वावर ६ महिने मुदतीच्या नेमणूका केलेल्या स्नेहल राजेंद्र मुळे,प्रज्वल अदिनाथ मिसाळ,शेख नाजनिन सज्जाद,विशाल गोरख शिंदे,अबोली दुर्योधन कासार,या इंजीनियर्स ची मुदत संपली आहे. नियमांनुसार त्यांचे पुर्ननियुक्ती बाबत अहवाल दिला आहे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- विषय क्रमांक ६ ते ९ मानधनावर करारबध्द नियुक्ती व पुर्ननियुक्ती चे असल्याने हे विषय मंजूर करण्यात यावेत.पाणीपुरवठा हा महत्वाचा विभाग आहे.या विभागातील मुदत संपलेल्या मानधनावरील इंजिनीयर्सना मुदतवाढ देण्याचा ठराव यासभेत प्रस्ताव क्र.९ च्या ठरावात समाविष्ट

करून नियमानुसार कार्यवाही करावी.

मा.सौ.छाया तिवारी :- विषय क्रमांक ६ ते ९ विषय मंजूर करण्यात यावेत.पाणीपुरवठा विभागातील मुदत संपलेल्या मानधनावरील इंजिनीयर्स ना मुदतवाढ देण्याचा ठराव यासभेत प्रस्ताव क्र.९ च्या ठरावात करून समाविष्ट करून नियमानुसार कार्यवाही करा.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक ६ ते ९ मानधनावर करारबध्द नियुक्ती व पुर्ननियुक्ती चे असल्याने हे विषय मंजूर करण्यात यावेत.पाणीपुरवठा विभागातील मुदत संपलेल्या मानधनावरील इंजिनीयर्स ना मुदतवाढ देण्याचा ठराव यासभेत प्रस्ताव क्र.९ च्या ठरावात समाविष्ट करून नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरूपात भुलतज्ञांच्या पॅनलमध्ये डॉ. श्री. कृष्णा जी. अनारसे यांचा कॉल बेसीसवर समावेश करणेबाबतच्या ऑफिस रिपोर्टास ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.
नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.श्रीपाद छिंदम सही /-

अनुमोदक :- मा.सौ.छाया तिवारी सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०१**

विषय क्रमांक- ०७ सोमवार दि.२५/४/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.ज्योती लालासाहेब शिंदे (सोनवणे) यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा.यांनी त्यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतीका गृह ११५३ दिनांक १५/०३/२०१६ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " जा.क्र.आस्थापना करारबध्द ३८२६ दिनांक १४/०९/२०१५ अन्वये डॉ. सौ. ज्योती लालासाहेब शिंदे यांची वैद्यकीय अधिकारी कै. बा.दे.दवाखाना या पदावर तात्पुरत्या स्वरुपात करारबध्द पध्दतीने दिनांक ०२/१०/२०१५ पासुन सहा महिन्या करीता नेमणुक करण्यात आलेली होती. सदरच्या नेमणुकीचा कालावधी दिनांक ०१/०४/२०१६ रोजी संपत आहे. सदरच्या कालावधीमध्ये त्यांचे काम समाधानकारक आहे. त्यांनी पुढील कालावधीसाठी पुर्ननेमणुक करणे बाबत विनंती अर्ज केलेला आहे. तरी त्यांना नियमाप्रमाणे तांत्रिक खंड देऊन दिनांक ०४/०४/२०१६ पासुन सहा महिन्या करीता वैद्यकीय अधिकारी कै. बा.दे.दवाखाना या पदावर पुर्ननेमणुक करणे शिफारस आहे. " असे नमुद करुन निर्देशित केलेले आहे.

यापुर्वी मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा.यांनी त्यांचे कडील जा. क्र. कै. बा.दे.दवा. व सुतीका गृह ३८१ दिनांक ०८/०७/२०१५ अन्वये व जा.क्र.कै.बा.दे.दवा. व सुतीका गृह ५११ दिनांक २०/०८/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कै,बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार संबधीतांची तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी या पदी अटी व शर्ती प्रमाणे जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणूक ३८२६ दिनांक १४/०९/२०१५ अन्वये तांत्रिक खंड देवुन दिनांक ०२/१०/२०१५ पासुन सहा महिन्या करीता दरमहा रु २०,०००/- या मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करुन तद्नंतर सदर केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा. स्थायी समितीकडे इकडील जा. क्र. आस्था. वर्कशिट ११५ दिनांक १९ / ९ / २०१५ अन्वये पाठविण्यात आलेला होता.

सदर प्रस्तावावर मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १७ दि.१४/१०/ २०१५ अन्वये ठराव पारीत करुन सदर संबधितांच्या मानधनावरील केलेल्या कालावधीतील करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी दिलेली आहे.

सद्यस्थितीमध्ये अ.नगर मनपाच्या कै, बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी या पदी डॉ.ज्योती लालासाहेब शिंदे (सोनवणे) यांची अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | कार्यरत ा विभाग | कार्यरत वर्ष | सद्यस्थितीमधील तांत्रिक खंड देवुन जा.क्र. आस्था . करारबध्द नेम. व दि. | सद्यस्थिती मधील सहा महिने नियुक्ती कालावधी | दरमहा मानधन रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.ज्योती लालासाहेब शिंदे (सोनवणे) | वैद्यकीय अधिकारी | कै.बा. दे.दवा. | दि.२२/३/२०१३ पासुन तांत्रिक खंड देवुन वेळोवेळी सहा महिन्या करीता मानधना वर पुर्ननेमणुक | ३८२६ १४/०९/२०१५ | ०२/१०/१५ ते ०१ / ०४ / २०१६ | २०,००० |

सदर वरील संबधीतांची तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे केलेल्या कालावधीतील मानधनावरील पुर्ननेमणुकीची मुदत ही दिनांक ०१ / ०४/२०१६ पासुन समाप्त होत आहे.

मा.महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक-अमपा-२०१२/प्र.क्र. ३०१ (भाग -२) / नवि- २५, मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास नुकतेच मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यामध्ये पान नं. २२ वरील विवरण पत्र क्रमांक २९ मध्ये रुग्णालय व आरोग्य सेवा विभागासाठी **वैद्यकीय अधिकारी** या पदांची संख्या खालील प्रमाणे दर्शविण्यात आलेली आहे.

| अ. क्रं. | पदांचा तपशिल | मंजुर पदे | नवीन पदे | एकुण पदे | व्यपगत |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | १० | १ | ११ | ---------- |

तसेच मा. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार - ब , शनिवार , फेब्रुवारी ६, २०१६ / माघ १७ , शके १९३७ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या आवश्यक शैक्षणिक पात्रतेस मान्यता दिलेली असुन त्यामधील पान नं. ३० वरील परिशिष्ट २ मध्ये अनु.क्रं. ९७ मध्ये वैद्यकीय अधिकारी या पदास खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता व नेमणुकीची पध्दत नमुद केलेले आहे.

| अ. क्रं. | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकी करीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ९७ | आरोग्य सेवा<br>सेवा श्रेणी -२ | वैद्यकीय अधिकारी | नामनिर्देशन<br>१०० % | ३३ वर्षे | **अ)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम बी बी एस / बी ए एम एस (आयुर्वेद) / बी एच एम एस (होमिओपॅथी) किंवा शासन समकक्ष पदवी.<br>**ब)** शासकीय / निमशासकीय / खाजगी रुग्णालयातील संबधित विषयातील ३ वर्षाचा अनुभव.<br>**क)** महाराष्ट्र मेडीकल कौन्सिल अधिनियम अंतर्गत नोंदणी आवश्यक. |

सदरचा आकृतीबंध हा अनु. क्रं. १ ते ७ या अटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजुर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये अनु.क्रं. १ ,२ , ६ व ७ खालील प्रमाणे अटी व शर्ती नमुद केलेली आहे.

**१)** शासन निर्णय दिनाक १० ऑगस्ट २००९ मध्ये स्पष्ट केल्यानुसार , शासनाने ज्याप्रमाणे ६ व्या वेतन आयोगाच्या सुधारीत वेतनश्रेणी लागु केल्या आहेत. त्याप्रमाणेच महानगरपालिकेच्या अधिकारी / कर्मचा-यांना सुधारीत वेतनश्रेणी लागु करणे आवश्यक आहे. सदर अटीची पुर्तता झाल्यानंतर , नविन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणारी पदे आस्थापना खर्च विहीत मर्यादेत (३५ %) असल्यास विहीत मार्गाने भरता येईल.

**२)** महानगरपालिकेच्या ज्या सेवा आऊट - सोर्सिंगद्वारे करणे शक्य व आवश्यक आहे. अशा सेवा आऊट - सोर्सिंगद्वारे करण्यात याव्यात.

६) अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना खर्चाची टक्केवारी ही शासन निर्णय, दिनांक ०४.०५.२००६ नुसार विहित केलेल्या मर्यादेत येत नाही तोपर्यंत नवीन पदे न भरण्याचे शासनाचे आदेश कायम राहतील.

७) नविन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणा-या प्रत्येक संवर्गाची शासन नियमानुसार बिंदु नामावली अद्ययावत करुन ती प्रमाणात करुन घेणे, तसेच बिंदु नामावलीनुसार येणा-या आरक्षणाप्रमाणे पदे भरणे आवश्यक राहील. बिंदु नामावली प्रमाणित केल्याशिवाय कोणत्याही संवर्गातील पदे सरळसेवा, पदोन्नती अथवा प्रतिनियुक्तीने भरण्यात येऊ नयेत.

मा.महाराष्ट्र शासन,नगर विकास विभाग ,शासन निर्णय, क्रमांक- अमपा-२०१२/ प्र.क्र.३०१ (भाग -२) /नवि-२५, मंत्रालय, मुंबई३२ दिनांक ६ फेब्रुवारी,२०१६नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापने वरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधामधील रुग्णालय व आरोग्यसेवा विभागासाठी मंजुर दर्शविण्यात आलेल्या वैद्यकीय अधिकारी यापदी आवश्यक ती पुढील कार्यवाही करुन सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन कायम नियुक्तीसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

सद्यस्थितीमध्ये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्या करीता तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदी अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता केलेल्या मानधनावर करारबध्द नियुक्ती वरील दर्शविलेल्या संबधितांची शैक्षणिक अर्हता ही खालील प्रमाणे असुन त्याबाबतचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.नं. | नांव | धारण केलेली शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | डॉ.ज्योती लालासाहेब शिंदे (सोनवणे) | बी.ए.एम.एस. |

सद्यस्थिती आस्थापनेवर रुग्णालया करीता वैद्यकीय अधिकारी यांची मंजुर पद संख्या , भरलेली पद संख्या , रिक्त पद संख्या या बाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ. क्रं. | विभाग | पदांचे नांव | मंजुर पद संख्या | भरलेली पद संख्या | रिक्त पद संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | कै.बा.दे.दवाखाना | १) लेडी डॉक्टर इनचार्ज | १ | १ | ------ |
| | | २) लेडी डॉक्टर पुरुष | १ | ------- | १ |
| | | ३) लेडी डॉक्टर स्त्री | १ | १ | ------ |
| २ | नवी पेठ दवाखाना | १) मेडीकल ऑफिसर | १ | १ | ------- |
| | | २) डॉक्टर | २ | २ | ------- |
| ३ | दाणे डबरा दवाखाना | मेडीकल ऑफिसर | १ | १ | ------- |
| ४ | जिजामाता दवाखाना | मेडीकल ऑफिसर | १ | १ | ------- |
| ५ | फॅमिली प्लॅनिंग | १) मेडीकल ऑफिसर (स्त्री) | १ | १ | ------- |
| | | २) मेडीकल ऑफिसर (पुरुष) | १ | ------- | १ |
| | | एकुण | १० | ०८ | ०२ |

सद्यस्थितीमध्ये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्या करीता तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदी अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता केलेल्या मानधनावर करारबध्द नियुक्ती पद संख्या बाबतचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ. क्रं. | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | मानधनावरील पद संख्या |
|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | कार्यरत संख्या - ५<br>प्रस्तावीत प्रस्ताव संख्या - २ |
| | एकुण | ७ |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये **५३ :- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे** याबाबत नमुद केलेले आहे. (सोबत : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ तरतुद बाबतची छायंकित प्रत.)

अहमदनगर महानगरपालिकेच्या कै. बाळासाहेब देशपांडे दवाखानामध्ये मा. शासनाच्या निर्देशाप्रंमाणे शिशु जननी योजने अतर्गत रुग्णांना मोफत आरोग्य सेवा देणे अत्यावश्यक सेवेची बाब आहे.

मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा.यांनी त्यांचेकडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतीका गृह ११५३ दिनांक १५/०३/२०१६ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा. स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी या पदी संबधीतांची सदर कालावधीतील केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक ०४/०४/२०१६ पासुन सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे करारा नुसार दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी निर्णय झाल्यास दरमहा रुपये २०,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च १,२०,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा.यांनी त्यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतीका गृह ११५३ दिनांक १५/०३/२०१६ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी या पदी डॉ.ज्योती लालासाहेब शिंदे (सोनवणे) यांची अटी व शर्ती नुसार सदर कालावधीतील केलेल्या करारबध्द मानधनावरील पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक ०४/०४/२०१६ पासुन सहा महिन्या करीता रु २०,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा निर्णया करीता मा.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत मा.मुख्य लेखाधिकारी व अंतर्गत लेखा परिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे निर्णया करीता पाठविणे बाबत मंजुरीसाठी निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे प्र. आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर सहाय्यक आयुक्त यांची स्वाक्षरी

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,प्रस्तावाप्रमाणे मान्यतेस्तव

यावर मा.मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की,प्रस्तावाप्रमाणे मा.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ चे कलम ५३ नुसार रिक्त पदाचे अनुषंगाने कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,विभागाचा प्रस्ताव मानयतेस्तव

यावर मा.आयुक्त साहेब यांची संमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब **:-** कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.ज्योती लालासाहेब शिंदे (सोनवणे) यांची सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्या प्रमाणे सभेमध्ये आफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :-हे सर्व व्यवस्थीत काम करतात का?

वैदयकीय आरोग्य अधिकारी श्री.राजूरकर :- हो व्यवस्थीत काम करतात.

मा.सभापती साहेब :- ऑटोमोबाईल इंजीनियर काम कसे करतात.पाणीपुरवठा विभागाचे काम महत्वाचे आहे.त्याकरीता पुरेसा कर्मचारी वर्ग आहे का.

निकम,मेंकॅ.इंजी. :- ऑटोमोबाईल इंजीनीयर्स चांगले काम करतात.पाणी पुरवठा विभागाचे काम नियोजन पुर्वक सुरू आहे. पाणी पुरवठ्या कडे मानधन तत्वावर ६ महिने मुदतीच्या नेमणूका केलेल्या स्नेहल राजेंद्र मुळे,प्रज्वल अदिनाथ मिसाळ,शेख नाजनिन सज्जाद,विशाल गोरख शिंदे,अबोली दुर्योधन कासार,या इंजीनियर्स ची मुदत संपली आहे. नियमांनुसार त्यांचे पुर्ननियुक्ती बाबत अहवाल दिला आहे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- विषय क्रमांक ६ ते ९ मानधनावर करारबध्द नियुक्ती व पुर्ननियुक्ती चे असल्याने हे विषय मंजूर करण्यात यावेत.पाणीपुरवठा हा महत्वाचा विभाग आहे.या विभागातील मुदत संपलेल्या मानधनावरील इंजिनीयर्स ना मुदतवाढ देण्याचा ठराव यासभेत प्रस्ताव क्र.९ च्या ठरावात समाविष्ट करून नियमानुसार कार्यवाही करावी.

मा.सौ.छाया तिवारी :- विषय क्रमांक ६ ते ९ विषय मंजूर करण्यात यावेत.पाणीपुरवठा विभागातील मुदत संपलेल्या मानधनावरील इंजिनीयर्स ना मुदतवाढ देण्याचा ठराव यासभेत प्रस्ताव क्र.९ च्या ठरावात करूनसमाविष्ट करून नियमानुसार कार्यवाही करा.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक ६ ते ९ मानधनावर करारबध्द नियुक्ती व पुर्ननियुक्ती चे असल्याने हे विषय मंजूर करण्यात यावेत.पाणीपुरवठा विभागातील मुदत संपलेल्या मानधनावरील इंजिनीयर्स ना मुदतवाढ देण्याचा ठराव यासभेत प्रस्ताव क्र.९ च्या ठरावात समाविष्ट करून नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.ज्योती लालासाहेब शिंदे (सोनवणे) यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.श्रीपाद छिंदम सही /-

अनुमोदक :- मा.सौ.छाया तिवारी सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०१**

विषय क्रमांक- ०८ सोमवार दि.२५/४/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील ) यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की , बांधकाम विभाग यांनी त्यांचे कडील जा.क्र. सार्व. बांधकाम विभाग १९६२ दिनांक ०५ / ०३ / २०१६ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " खाली नमुद केलेल्या अभियंत्यांची कंत्राटी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात सार्व. बांधकाम विभागाकडेस कनिष्ठ अभियंता या पदावर सहा महिन्या करीता नेमणुक केली आहे.

| अ नं | अभियंत्यांचे नांव | मुदत पर्यत |
|---|---|---|
| १ | श्री.पडोळे राहुल शंकर | ५/४/२०१६ |
| २ | श्री.जाधव सचिन शिवाजी | ५/४/२०१६ |
| ३ | श्री.भोसले मुंकुद फत्तेसिंग | ५/४/२०१६ |
| ४ | श्री.जाधव नंदकिशोर विठ्ठल | २६/४/२०१६ |

वरील तक्त्यातील अभियंत्यांची नेमणुक रकाना नं.३ मध्ये दर्शविलेल्या तारखेस संपत आहे. सध्या बांधकाम विभागामध्ये श्री.एस.आर.निंबाळकर , श्री. एम.एस.पारखे असे एकुण २ अभियंते आहेत कंत्राटी पध्दतीने घेतलेल्या अभियंत्यामुळे दैनंदिन कामे थोड्याफार प्रमाणात सुरळीत होत आहे. सध्या बांधकाम विभागामार्फत नगरोत्थान योजना , बी.आर.जी.एफ नागरी दलित वस्ती सुधारणा व महानगरपालिका फंडातील कामे चालु आहेत त्यामुळे कामे सुरळीत होण्याकरीता वरील अभियंत्यांची आवश्यकता आहे. या अभियंत्यांची सहा महिन्यांची मुदत वरील तारखेस संपत आहे. त्यांना पुढील सहा महिन्याचे कालावधीसाठी नेमणुक देणे बाबत आस्थापना विभागाकडून प्रस्ताव ठेवणे बाबत." नमुद करुन सुचित केलेले आहे.

वरील तक्त्यातील अनु.क्रं. १ ते ३ यांचे बाबत मा.प्र. शहर अभियंता , बांधकाम विभाग यांचे कडील दिनांक ३०/०५/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदी अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करिता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता दिनांक १५/०८/२०१५ रोजीच्या दैनिक सामना यावर्तमान पत्रामध्ये जहिरात प्रसिध्दीस देवुन उमेदवारांच्या थेट पध्दतीने **(Walk In Interview)** नुसार मुलाखती दिनांक २६/०८/२०१५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार मा.अतिरिक्त आयुक्त तथा अध्यक्ष , निवड समिती , अहमदनगर महानगरपालिका यांचे अध्यक्षते खाली मा. निवड समिती यांनी उपस्थित उमेदवारांच्या थेट पध्दतीने मुलाखती घेवुन पात्र ठरवुन निवड केलेली होती. त्यानुषंगाने बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदी अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करिता जा.क्र. आस्था. करारबध्द नेमणुक ५१७६ दिनांक ०६/१०/२०१५ अन्वये वरील तक्त्यामधील अनु.क्रं. १ ते ३ यांची दरमहा रुपये २०,०००/- या मानधनावर करारबध्द नियुक्ती ही बांधकाम विभाग येथे करण्यात आलेली आहे.

तसेच वरील तक्त्यामधील अनु.क्रं. ४ श्री. जाधव नंदकिशोर विठ्ठल यांचे बाबत सद्यस्थितीमध्ये मा.प्र.शहर अभियंता, यांचे कडील जा.क्र. बांधकाम विभाग ३९१ दिनांक ०१/०६/२०१५ चे पत्राच्या अहवालाच्या अनुषंगाने बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा निर्णयाकरीता इकडील जा.क्र.आस्था.वर्कशीट ४१ दि.२६/६/२०१५ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता. सदरच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २१ दि.१४/१०/२०१५ अन्वये ठराव पारीत करुन पुर्व मंजुरी नुसार श्री.जाधव नंदकिशोर विठ्ठल यांची जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणुक ५६५०दि.२७/१०/२०१५ अन्वये अटी व शर्तीनुसार तांत्रिक खंड देवुन दिनांक २८/१०/२०१५ पासुन पुढील सहा महिन्या करीता दरमहा रुपये २०,०००/- या मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीमध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता(सिव्हील)या पदांवर अटी व शर्ती नुसार सहामहिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती केलेल्या संबधीतांची त्याबाबतची माहीती खालीलप्रमाणे तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रु | जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक व दि. | नियुक्ती दिनांक | मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पडोळे राहुल शंकर | कनिष्ठ अभियंता ( सिव्हील) | २०,०००/- | ५१७६ ०६/१०/२०१५ | ०६/१०/२०१५ पासुन सहामहिन्या करीता | ०५/०४/२०१६ |
| २ | जाधव सचिन शिवाजी | कनिष्ठ अभियंता ( सिव्हील) | २०,०००/- | ५१७६ ०६/१०/२०१५ | ०६/१०/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | ०५/०४/२०१६ |
| ३ | भोसले मुंकुद फत्तसिंग | कनिष्ठ अभियंता ( सिव्हील) | २०,०००/- | ५१७६ ०६/१०/२०१५ | ०६/१०/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | ०५/०४/२०१६ |
| ४ | जाधव नंदकिशोर विठ्ठल | कनिष्ठ अभियंता ( सिव्हील) | २०,०००/- | ५६५० २७/१०/२०१५ | २८/१०/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | २७/०४/२०१६ |

सदर वरील संबधीतांची सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे केलेल्या कालावधीतील मानधनावरील नेमणुकीची मुदत ही वरील तक्त्यात दर्शविलेल्या दिनाकांपासुन समाप्त होणार आहे.

मा. महाराष्ट्र शासन , नगर विकास विभाग , शासन निर्णय , क्रमांक - अमपा - २०१२ / प्र.क्र. ३०१ (भाग -२) / नवि - २५ , मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास नुकतेच मान्यता प्राप्त झालेली आहे.

त्यामध्ये पान नं. १६ वरील विवरण पत्र क्रमांक २१ मध्ये अनु. क्र. ५ नुसार शहर अभियंता (स्थापत्य) विभागासाठी कनिष्ठ अभियंता ( सिव्हील) - ८ इतकी पद संख्या दर्शविण्यात आलेली आहे.

